सुक्रांद

# गरीब शेतकरी-मजूर-कामगार-दलित-स्त्रीयांचा समता जुलूस

हा 'समता जुलूस' आपणा सर्वांचा आहे. कष्ट करणाऱ्या प्रत्येक माणसाचा आहे. कष्टाला कुठली जात-धर्म नसतो. तिथं माणूस समान असतो. म्हणून हा जुलूस सर्व जाती-धर्मांतील कष्टकऱ्यांचा आहे.

आपल्या इथला माणूस मात्र हजारो जातींच्या भिताडांमुळे पार फुटून गेलाय. दोन गरिबांतच भांडण लागलीयत. या आपल्या फुटीचा फायदा इथले बडे मालदार घेतायत. आणि माड्यावर माड्या बांधतायत. आपण मात्र या आपल्या शत्रूला पार विसरून गेलोय.

आणि म्हणूनच साऱ्या देशभर बेलछी, बाजीतपूर, कानपूर, पंतनगर, कांझावाला, जमशेटपूर, इथं आपल्याच कष्टकरी-दलित बांधवांवर, अमानुष अत्याचार झाले. बाजीतपूरला तर गर्भार बायांवर अनेक पुरुषांनी बलात्कार केले आणि आपल्या मराठवाड्यात सुद्धा गेल्या वर्षी असंच घडलं.

'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नांव द्या' अशी मागणी आपल्यातल्याच काही जणांनी केली. मागणी शांततेच्या, सत्याग्रही मार्गाने करीत होते. मात्र आपण आपल्या गरीबीचा, बेकारीचा, मागासलेपणाचा संबंध डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतर चळवळ, राखीव जागा, एक गाव एक पाणवठा मंदीर प्रवेश, रोजगार हमी योजनेवर काम करणारा दलित माणूस, दलित साहित्य चळवळ या गोष्टींशी लावला. आणि आपण आपला शत्रू दलित जातींनाच मानलं.

आपल्या या गैरसमजाचा फायदा काही मूठभरांनी घेतला. आणि आपण सर्व कष्टकरी बदनाम झालो. आपली मान खाली जाईल अशा घटना घडल्या.

त्यात काय डाव होता? तर सवर्ण जातीतील आपण गरीब कष्ट करणारी माणसं आणि दलित जाती, अल्प संख्यांक यांच्यामध्ये कायमची दरी निर्माण करायची. हा डाव आपल्या मराठवाड्यातील नाही; तर साऱ्या देशातील भांडवलदार, ब्राह्मणी-सरंजामी-जातीयवादी शक्तींनीच टाकला आहे.

यातून फार मोठा धोका आहे. आज विद्यापीठ नामांतरावरुन दलित जातींवर अत्याचार होत आहेत. उद्या हेच हल्ले आपणा सवर्ण गरिब शेतकरी, मजूर, मध्यम शेतकरी, आदिवासी, कामगार स्त्रीया, व अल्पसंख्य मुसलमानावर होणार आहेत. कारण आपण आपल्या शोषणा विरुद्ध, आपल्या मुक्तीसाठी उद्या संघटीत होणार आहोत. आज दलित जाती जात्यात आहेत आणि आपण सारे सुपात आहोत. एवढाच फरक आहे.

म्हणूनच विद्यापीठ नामांतराचा लढा हा आज आपल्या सर्वांच्यात्र समतेचा-मुक्तीचा लढा होवून बसला आहे. विद्यापीठ नामांतराला विरोध केला तर येथील भांडवलदार ब्राह्मणी-सरंजामी-जातीयवादी शक्तीच बळकट होतील. नामांतर लढ्याचे अपयश हे उद्याच्या आपणा सर्व कष्टकऱ्यांचे अपयश आहे.

यासाठीच आपला हा 'समता जुलूस' निघालाय. हा आपणा सर्व जाती जमातीतील कष्टकऱ्यांचा 'शोषण मुक्ती मोर्चा' आहे. आपल्याला सरकारला जाब विचारायचा आहे.

महात्मा ज्योतिराव फुले, शाहू छत्रपती, आणि डॉ. आंबेडकरांच्या सत्यशोधक मार्गाने येथील भांडवलशाही. ब्राह्मणी-सरंजामी शक्तींना खतम करुन श्रमिक-दलितांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी-समता आणण्यासाठी ६ डिसें. च्या औरंगाबादला 'नामांतरवादी विद्यार्थी-नागरिक कृती समितीच्या समता सत्याग्रहा'त आपण सर्वांनी शामील व्हायला हवं.

P.T.O.